मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 27 मे 2026 | पान- 1

# पिंपरी-चिंचवड महापालिकेचा मोठा निर्णय; परदेश दौरे रद्द

## ऊर्जा बचत, इंधन नियंत्रण, ऑनलाईन बैठका आणि सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य; महापौरांचाही बाकू दौरा रद्द




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अधिकारी, कर्मचाऱ्यांचे अभ्यास, प्रशिक्षण किंवा शासकीय कामकाजासाठी मंजूर असलेले परदेश दौरे रद्द करण्यात आले आहेत. नवीन परदेश दौऱ्याचे नियोजन करण्यात येऊ नये. असे कठोर निर्णय महापलिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतले आहेत. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धामुळे तसेच, इंधन संकटामुळे महाराष्ट्र शासनाने सर्व महापालिकांना ऊर्जा बचत, इंधन वापर नियंत्रण, खर्च नियंत्रण व कार्यपद्धती संदर्भातील उपाययोजना राबविण्याचे आदेश 13 मे 2026 च्या पत्रानुसार दिले आहेत. त्यानुसार, आयुक्तांनी काटकसर करण्यासाठी वरील निर्णय घेतले आहेत. तो निर्णय सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना लागू होणार आहेत.

सर्व कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा जास्तीत जास्त वापर करावा. कार्यालयीन वेळ संपल्यानंतर दिवे, पंखे, वातानुकूलित यंत्रणेचे तापमान 24 ते 26 अंश सेल्सिअस दरम्यान ठेवण्यात यावे. महापालिकेचे कॅन्टीन, रुग्णालये, वसतीगृह, बालवाडी, अंगणवाडी तसेच, इतर भोजन व्यवस्थांमध्ये खाद्यतेलाचा नियंत्रित व संतुलित वापर करावा. आरोग्यविषयक दृष्टिकोन तसेच, आयाताधारित तेलावरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने पाम, सोयाबीन व सूर्यफूल तेलाच्या तुलनेत स्थानिकस्तरावर उपलब्ध मोहरी, शेंगदाणा तेलाचा वापर करावा. संबंधित विभागांनी पोषणमूल्यांचा विचार करून आवश्यकतेनुसार आहार नियोजनामध्ये सुधारणा कराव्यात, असे आदेशात म्हटले आहे.

कार्यालयीन कामकाजासाठी नियोजित स्थळभेटी, पाहण्या व तपासणी दौऱ्यासाठी कमीत कमी वाहनांचा वापर करण्यात यावा. वाहन वापराचे योग्य नियोजन करण्यात यावे. अधिकारी व कर्मचाऱ्यांचे संयुक्त दौरे ठरवताना शक्यतो कारपुलिंग पद्धतीचा अवलंब करावा, त्यामुळे इंधन बचत होईल. कार्यालयीन कामकाजासाठी दौरे अपरिहार्य असल्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेट्रो, रेल्वे, पीएमपी बस किंवा सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्राधान्याने वापर करावा. विभागप्रमुख व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातील किमान एक दिवस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याबात सकात्मक पुढाकार घ्यावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

### महापालिका बैठक ऑनलाईन घेणार

» महापालिकास्तरावरील बैठका, प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्रे, आढावा बैठका व सेमिनार शक्यतो व्हिडीओ कॉन्फरन्स किंवा ऑनलाईन आयोजित करण्यात यावेत. सर्व विभागांनी अंतर्गत बैठका, प्रशिक्षण व समन्वय सभा ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यास प्राधान्य द्यावे. त्यामुळे प्रवास व इतर खर्चात बचत होईल. माहिती, प्रसिद्धी व जनजागृती संदर्भातील जाहिराती, बॅनर्स, फ्लेक्स, सजावटीचे विद्युत दिवे व इतर खर्चिक बाबींचा वापर आवश्यकतेपुरताच मर्यादित ठेवावा. अनावश्यक खर्च टाळावा, असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

# 85 टक्के नालेसफाईचा दावा, 'स्पायडर मशिन' अभावी काम रखडले?

## मोठ्या आकाराच्या नाल्याच्या साफसफाईसाठी 'स्पायडर मशिन' उपलब्ध होत नसल्याने कामास विलंब झाल्याचे प्रशासनाने सांगितले.



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात तीन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसामुळे रस्त्यांना तळ्याचे स्वरूप आल्याने फज्जा उडाल्यानंतर महापालिका प्रशासनाने नालेसफाईला वेग दिला आहे. सोमवारअखेर ८५ टक्के नालेसफाई पूर्ण झाली असून ३१ मेपर्यंत शंभर टक्के काम पूर्ण करण्याचा दावा अधिकाऱ्यांनी केला आहे. मोठ्या आकाराच्या नाल्याच्या साफसफाईसाठी 'स्पायडर मशिन' उपलब्ध होत नसल्याने कामास विलंब झाल्याचे प्रशासनाने सांगितले.

शहरात एप्रिल महिन्यात नालेसफाईचे काम सुरू करण्यात आले होते. सर्व आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या आरोग्य विभागाकडून नालेसफाईचे काम केले जात आहे. शहरात लहान व मोठे असे एकूण १४१ नाले आहेत. या नाल्यांची एकूण लांबी ९१.५ किलोमीटर इतकी आहे. सोमवारअखेर नालेसफाईचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे.

शहरातील मोठ्या आकाराच्या नाले सफाईचे काम शिल्लक आहे. त्यासाठी स्पायडर मशिनची कमतरता आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरात एकाच ठेकेदाराकडे पाच स्पायडर मशिन आहेत. त्यामधील पिंपरी महापालिकेस केवळ दोन स्पायडर मशिन उपलब्ध झाल्या आहेत. त्याद्वारे सध्या काम सुरू आहे. 'इ', 'फ' आणि 'ह' क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील ९० टक्यांपुढे नालेसफाईचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित मोठ्या नाल्यांची सफाई स्पायडर मशिनने केली जात आहे. 'अ', 'ब', 'क', 'ड' आणि 'ग' या क्षेत्रीय कार्यालयांतील नालेसफाईचे काम संथगतीने सुरू आहे. ते काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### पाण्याचा निचरा होण्यास अडथळा

» शहरातील विविध भागांत विकासकामे सुरू आहेत. खोदकाम, पेव्हिंग ब्लॉक, कॉँक्रिटीकरणाची कामे अनेक ठिकाणी अर्धवट स्थितीत आहेत. या कामांमध्ये पाण्याचा नैसर्गिक उताराचा विचार न केल्याने पाणी वाहून जाण्याचे मार्ग बंद झाले आहेत. नाल्यांमधील गाळ काढला असता, तरी रस्ते कामांमधील नियोजनशून्यता, सांडपाणी आणि पावसाळी पाणी वाहिनीशी योग्य जोडणी न केल्याने पावसाच्या पाण्याचा निचरा झाला नसल्याचे पहिल्याच पावसात दिसून आले.

# रक्षक चौक येथील वाहतूक पर्यायी मार्गाने उपलब्ध

## वाहनचालकांनी वेगमर्यादा आणि वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे महापालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी फाटा ते किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे काम पुर्णत्वाकडे आले आहे. सध्या पर्यायी मार्गाने वाहतूक उपलब्ध असून या प्रकल्पाचे सर्व सुरक्षा निकष पूर्ण करण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या माध्यमातून सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे. तसेच वाहतूक सुरक्षिततेचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी वाहतूक मंत्रालय तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या मान्यताप्राप्त सुरक्षा लेखापरीक्षण सल्लागार संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली होती.




याशिवाय, सल्लागार संस्थेकडून कामाच्या ठिकाणाची प्रत्यक्ष पाहणी, सर्वेक्षण आणि सखोल अभ्यास करण्यात आला आहे. त्यांच्या अहवालानुसार भुयारी मार्ग आणि त्यास जोडलेल्या रॅम्पच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या आहेत. तसेच भुयारी मार्ग आणि त्याच्या दोन्ही बाजूंच्या उतार रस्त्यांवर वाहनांना एकमेकांना ओलांडण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच इंडियन रोड काँग्रेस (आय.आर.सी) च्या मानकांनुसार सुरक्षित वेगमर्यादा दर्शविणारे ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे अनिवार्य फलक योग्य ठिकाणी बसविण्यात आले आहेत.

भुयारी मार्ग व त्याच्या दोन्ही बाजूंच्या रॅम्पवर संथ गतीने चालणारी वाहने, सायकलस्वार आणि पादचारी यांना प्रवेश प्रतिबंधित करण्यात आला असून त्यांच्यासाठी स्वतंत्र समतल सेवा रस्त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे सदर मार्ग हा केवळ मोटार वाहनांच्या वाहतुकीसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच बस जलद वाहतूक व्यवस्थेसाठी ताशी ३० किलोमीटर सुरक्षित वेगमर्यादेसह स्वतंत्र मार्गिका निश्चित करण्यात आली आहे.

उताराच्या रस्त्यांवर वेग नियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्व ठिकाणी भारतीय मानांकनानुसार आडव्या पट्ट्यांचे चिन्हांकन करण्यात आले आहे. तसेच वाहनचालकांना सतर्क करण्यासाठी मार्ग एकत्र येणाऱ्या आणि विभाजित होणाऱ्या ठिकाणी तसेच धोकादायक ठिकाणी सौरऊर्जेवर चालणारे पिवळे दिवे बसविण्यात आले आहेत. या उपाययोजनांमुळे वाहनचालकांना वेग कमी करण्याचा इशारा मिळून अपघाताचा धोका कमी होण्यास मदत होणार आहे.

रात्रीच्या वेळी दृश्यमानता वाढविण्यासाठी संरक्षक कठड्यांवर मध्यदर्शक बसविण्यात आले आहेत. या मध्यदर्शकांवर भारतीय मानांकनानुसार पिवळ्या रंगाची प्रकाश परावर्तित करणारी पट्टी बसविण्यात आली आहे. याशिवाय संपूर्ण पुलावर ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादा दर्शविणारे वाहतूक नियंत्रण फलक लावण्यात आले आहेत, अशी माहिती स्थापत्य प्रकल्प विभागाकडून देण्यात आली आहे.

> **सांगवी-किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे बांधण्यात आलेल्या भुयारी मार्गाच्या दोन्ही रॅम्पसंदर्भातील सुरक्षा तपासणीतील सर्व बाबी पूर्ण करण्यात आल्या आहेत. नागरिकांनी या मार्गावर ताशी ३० किलोमीटर वेगमर्यादेचे पालन करावे तसेच वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळावेत.**
>
> **- प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> **सांगवी-किवळे रस्त्यावरील रक्षक चौक येथे उभारण्यात आलेल्या भुयारी मार्गाचे काम पुर्णत्वाकडे आले असून सध्या पर्यायी मार्गाने वाहतूक सुरू आहे. वाहतूक कोंडी कमी होऊन अडथळाविरहीत प्रवासासाठी हा भुयारी मार्ग सोयीचा ठरणार आहे. नागरिकांनी वेगमर्यादा आणि वाहतुकीचे नियम पाळणे बंधनकारक आहे. तसेच बीआरटीएस मार्गिकांमध्ये खासगी चारचाकी, दुचाकी वाहनांनी प्रवेश करू नये व वाहतुकीच्या नियमांचे पालन करावे.**
>
> **- कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# पिंपरी-चिंचवडमध्ये बेसुमार वृक्षतोड; सहा वर्षांत 21 हजार झाडांची कत्तल

## मागील सहा वर्षांत तब्बल 21 हजार 338 झाडांची अधिकृत कत्तल करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

यंदाच्या तीव्र उन्हाळ्यात पिंपरी-चिंचवड शहरातील तापमानाने उच्चांक गाठल्याने नागरिक अक्षरशः होरपळून निघत आहेत. वाढते शहरीकरण, रस्ते रुंदीकरण, मेट्रो प्रकल्प, विविध विकासकामे आणि सततच्या खोदकामांमुळे शहरातील हिरवळ झपाट्याने कमी होत असल्याचे चित्र समोर आले आहे. विकासाच्या नावाखाली मागील सहा वर्षांत तब्बल २१ हजार ३३८ झाडांची अधिकृत कत्तल करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



महापालिकेने मागील सात वर्षांत ९ लाख ६४ हजार ११७ झाडांचे रोपण केल्याचा दावा केला असला, तरी त्यापैकी प्रत्यक्षात किती झाडे जिवंत आहेत, याची स्पष्ट माहिती उद्यान विभागाकडे उपलब्ध नाही. विशेष म्हणजे २०१९ मध्ये करण्यात आलेल्या वृक्षगणनेचा अहवालही अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. त्यामुळे महापालिकेच्या वृक्षलागवडीच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरवर्षी सुमारे सव्वा लाख झाडांची लागवड केली जात असली, तरी दुसरीकडे परवानगीने आणि विनापरवाना हजारो झाडांची तोड सुरूच असल्याने शहराची नैसर्गिक हिरवाई नष्ट होत चालली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार शहरात सध्या ३२ लाख १६ हजार ७९९ झाडे असल्याचा दावा केला जातोय. मात्र त्यातील किती झाडे प्रत्यक्षात अस्तित्वात आणि जिवंत आहेत, याची ठोस माहिती उपलब्ध नाही.

पर्यावरणप्रेमींनी विदेशी वृक्षांच्या वाढत्या प्रमाणाबाबतही चिंता व्यक्त केली आहे. शहरात पिंपळ, वड, चिंच यांसारख्या देशी वृक्षांऐवजी गुलमोहर, निलगिरी, रेन ट्री यांसारख्या विदेशी झाडांची संख्या वाढत आहे. ही झाडे जमिनीतील पाणी मोठ्या प्रमाणात शोषून घेतात तसेच वादळी पाऊस किंवा वाऱ्यात सहज उन्मळून पडतात. त्यामुळे पर्यावरण संतुलनावर परिणाम होत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

शहराचे पर्यावरण आणि तापमान नियंत्रणात ठेवण्यासाठी आगामी पावसाळ्यात कडुनिंब, जांभूळ, चिंच, आंबा यांसारख्या स्थानिक आणि देशी वृक्षांच्या लागवडीला प्राधान्य देण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून होत आहे.

दरम्यान, विकासकामांसाठी काही प्रमाणात वृक्षतोड अपरिहार्य असली तरी अनधिकृत वृक्षतोड करणाऱ्यांविरोधात पोलिसांत फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतात, अशी माहिती मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे यांनी दिली.

# मिळकतकर सवलतीची मुदत संपायला 5 दिवस; 10 लाख नागरिक अजूनही वेटिंगवर

## पुणे महापालिकेच्या मिळकतकर सवलत योजनेची अंतिम मुदत 31 मे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेच्या मिळकतकर सवलत योजनेची अंतिम मुदत अवघ्या पाच दिवसांवर आली असताना शहरातील मोठ्या संख्येने नागरिकांनी अद्याप कर भरलेला नसल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या नोंदीनुसार शहरात एकूण १५.०५ लाख मिळकती नोंदणीकृत असताना १ एप्रिल ते २५ मे या कालावधीत फक्त ४ लाख ९६ हजार ३२५ मिळकतधारकांनी कराचा भरणा केला आहे.

त्यामुळे सुमारे दहा लाखांहून अधिक नागरिकांनी अद्यापही कर भरलेला नाही. या पार्श्वभूमीवर मिळकतकराची बिले अनेक भागांत अद्याप पोहोचली नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. महापालिकेकडून पोस्टाद्वारे बिले पाठविली जात असली तरी अंतिम मुदत जवळ येऊनही अनेक नागरिकांना प्रत्यक्ष बिले मिळाली नसल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कर भरण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

तर दुसरीकडे महापालिकेने मोबाईलवर लिंकद्वारे कर भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. मात्र, ऑनलाइन फसवणुकीच्या वाढत्या घटनांमुळे अनेक नागरिक मोबाईलवर आलेल्या लिंकवरून व्यवहार करण्यास टाळाटाळ करीत असून, प्रत्यक्ष बिल आल्याशिवाय कर भरण्यास पुढे येत नसल्याचे चित्र आहे.

५५ दिवसांत महापालिकेच्या तिजोरीत ८४६ कोटी ७८ लाख रुपयांचा महसूल जमा झाला आहे. यामध्ये ऑनलाइन कर भरणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक असून ७२.१३ टक्के म्हणजे ३ लाख ५८ हजार २४ मिळकतधारकांनी ५५७ कोटी २ लाख रुपयांचा कर भरला आहे. तर चेकद्वारे २१४ कोटी ९ लाख रुपये आणि रोख स्वरूपात ७४ कोटी ८७ लाख रुपये जमा झाले आहेत.




### ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या वाढली

» पुणे महापालिकेच्या मिळकतकर वसुलीत यंदा ऑनलाइन व्यवहारांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. आतापर्यंत कर भरणा केलेल्या मिळकतधारकांपैकी तब्बल 72 टक्क्यांहून अधिक नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीचा वापर केला आहे. ऑनलाइन माध्यमातून 557 कोटी रुपयांहून अधिक महसूल जमा झाला आहे. नागरी सुविधा केंद्रांवरील गर्दी टाळण्यासाठी महापालिकेने संकेतस्थळासह विविध बँकांमधूनही कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. डिजिटल व्यवहारांमुळे वेळेची बचत होत असली तरी ऑनलाइन फसवणुकीच्या भीतीमुळे अनेक नागरिक अजूनही सावध भूमिका घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### ३१ मेनंतर सवलतीचा लाभ मिळणार नाही

» महापालिकेच्या मिळकतकर सवलत योजनेची अंतिम मुदत 31 मेपर्यंत असून त्यानंतर कर भरणाऱ्यांना 5 ते 10 टक्के सवलतीचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे नागरिकांनी अंतिम मुदतीपूर्वी कर भरणा करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कर वसुली वाढवण्यासाठी महापालिकेने विविध बँका, ऑनलाइन पोर्टल आणि सुविधा केंद्रांद्वारे व्यवस्था उपलब्ध करून दिली आहे. प्रशासनाच्या मते, वेळेत कर भरल्यास नागरिकांना आर्थिक सवलतीचा फायदा होणार असून महापालिकेलाही विकासकामांसाठी आवश्यक महसूल उपलब्ध होणार आहे.

### बिले न मिळाल्याने नागरिकांमध्ये संभ्रम

» शहरातील अनेक भागांत मिळकतकराची बिले अद्याप पोहोचली नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. कोथरूड, कात्रज, सिंहगड रस्ता, विश्रांतवाडी, नगररस्ता आणि मध्यवर्ती पेठांमधील नागरिकांनी प्रत्यक्ष बिले न मिळाल्याची नाराजी व्यक्त केली आहे. अंतिम मुदत जवळ येऊनही बिल न मिळाल्याने कर भरण्याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. महापालिकेने ऑनलाइन लिंकद्वारे सुविधा उपलब्ध करून दिली असली तरी अनेक नागरिक प्रत्यक्ष बिल आल्याशिवाय व्यवहार करण्यास पुढे येत नाहीत. त्यामुळे प्रशासनाने मुदतवाढ द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# खाऊगल्ली आता रात्री दहाला बंद! सार्वजनिक शांतता, सुव्यवस्थेसाठी पोलीस आयुक्तांचा मोठा निर्णय

## मध्यरात्रीनंतर खाऊगल्ल्यांमध्ये होणाऱ्या अनियंत्रित गर्दीला पुणे पोलिसांचा चाप; कायदा, सुव्यवस्था आणि सार्वजनिक शांततेसाठी आयुक्तांचे आदेश.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पदपथ, रस्त्यावरील हातगाड्या, स्टॉल, ठेले आणि पानटपऱ्या यांना रात्री दहा वाजेपर्यंतच व्यवसाय करण्याची परवानगी असताना अनेक ठिकाणी खाऊगल्ल्या मध्यरात्रीनंतरही सुरू राहत असल्याचे निदर्शनास आल्याने पुणे पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील सर्व खाऊगल्ल्या रात्री दहाच्या ठोक्याला बंद करण्याचे आदेश दिल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी दिली.

मागील आठवड्यात पोलीस आयुक्तांनी रात्रीच्या वेळी शहरातील विविध भागांना सलग दोन दिवस भेट देत कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला होता. यावेळी अनेक खाऊगल्ल्या रात्री उशिरापर्यंत सुरू असल्याचे, तसेच तेथे अनियंत्रित गर्दी होत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे सार्वजनिक शांतता आणि वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचे पोलिसांचे मत आहे. पोलीस आयुक्तांनी त्यानंतर सर्व पोलीस ठाण्यांना खाऊगल्ल्या रात्री दहाला बंद करण्याचे आदेश दिले.

मात्र काही ठिकाणी या कारवाईदरम्यान हॉटेल, दुकाने आणि इतर व्यावसायिक आस्थापनांनाही दहाच्या ठोक्याला व्यवसाय बंद करण्यास भाग पाडण्यात आल्याच्या तक्रारी समोर आल्या. गेल्या चार-पाच दिवसांपासून शहरातील अनेक भागांत हा प्रकार सुरू असल्याने नागरिक आणि व्यावसायिकांनी नाराजी व्यक्त केली होती. हॉटेल व्यावसायिकांच्या शिष्टमंडळानेही पोलीस आयुक्तांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिले होते.



### पदपथ मोकळे ठेवण्यावर पोलिसांचा भर

» पुणे शहरातील खाऊगल्ल्या आणि पदपथावरील वाढत्या गर्दीमुळे वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होत असल्याने पोलिसांनी कठोर भूमिका घेतली आहे. रात्री दहानंतर पदपथावर टेबल-खुर्च्या टाकून सुरू राहणारा व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यामुळे नागरिकांना पदपथावरून सुरक्षितपणे चालता येईल तसेच रस्त्यांवरील अनियंत्रित गर्दी कमी होण्यास मदत होणार आहे. परवानाधारक हॉटेल आणि रेस्टॉरंटना व्यवसाय सुरू ठेवण्याची मुभा असली तरी नियमांचे पालन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरातील सार्वजनिक शिस्त राखण्यासाठी ही कारवाई आवश्यक असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पाला वेग; 1523 एकर जमीन संपादन

## अतिरिक्त 500 कोटी निधी मंजूर; सात गावांतील भूसंपादन प्रक्रियेला मोठी गती

**पुणे | प्रतिनिधी**

बहुप्रतीक्षित पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला मोठी गती मिळाली असून, अवघ्या 15 दिवसांत सात गावांतील 1523 एकर जमीन प्रशासनाच्या ताब्यात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'आकर्षक पॅकेज'नंतर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर संमतीपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे जिल्हा प्रशासनाकडे जमा केली आहेत

जिल्हा प्रशासनाने 7 मेपासून संमतीपत्रे स्वीकारण्यास सुरुवात केली होती. या प्रक्रियेत आत्तापर्यंत 1523 एकर जमिनीसाठी 450 कोटी रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आले. त्यामुळे संबंधित गावांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. जमीन संपादनासाठी प्रतिज्ञापत्रे आणि पूरक कागदपत्रे स्वीकारण्याची प्रक्रिया 10 जूनपर्यंत सुरू राहणार आहे.

त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांना अजून 15 दिवसांचा वेळ आहे. मुदतीत संमती न देणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी पुढील टप्प्यात सक्तीने संपादित केल्या जाऊ शकतात. मात्र, अशा शेतकऱ्यांना सरकारकडून दिला जाणारा 10 टक्के जमीन परताव्याचा लाभ मिळणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, पुरंदर विमानतळासाठी सात गावांतील 1523 एकर जमिनीची प्रतिज्ञापत्रे प्राप्त झाली आहेत. त्यासाठी 450 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. आणखी संमतीपत्रे अपेक्षित असून, राज्य सरकारने त्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला आहे.

पुरंदर विमानतळासाठी एकूण तीन हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे. त्यातील जवळपास 50 टक्के जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्याचे मानले जात आहे. राज्य सरकारने पहिल्या टप्प्यात 500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता.




### आकर्षक पॅकेजमुळे भूसंपादनाला वेग

» पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी राज्य सरकारने जाहीर केलेल्या आकर्षक पॅकेजला शेतकऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. प्रशासनाने सुरू केलेल्या संमती प्रक्रियेत अवघ्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर प्रतिज्ञापत्रे जमा झाली आहेत. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून प्रकल्प मार्गी लागण्याच्या आशा बळावल्या आहेत. शेतकऱ्यांच्या खात्यात थेट निधी जमा होत असल्याने प्रक्रियेबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. विमानतळ प्रकल्पामुळे परिसरातील विकासाला चालना मिळणार असून रोजगार, उद्योग आणि वाहतूक क्षेत्रात मोठ्या संधी निर्माण होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पुरंदर विमानतळामुळे विकासाला नवे पंख

» पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा पुणे जिल्ह्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. या प्रकल्पामुळे पुणे आणि परिसरातील औद्योगिक, व्यावसायिक तसेच पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे. विमानतळ उभारणीमुळे रस्ते, पायाभूत सुविधा आणि गुंतवणुकीत वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. राज्य सरकार आणि प्रशासनाच्या समन्वयातून प्रकल्पाची प्रक्रिया गतीने पुढे सरकत असल्याने नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

### संमती प्रक्रियेला १० जूनपर्यंत मुदत

» पुरंदर विमानतळासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांना १० जूनपर्यंत संमतीपत्रे आणि प्रतिज्ञापत्रे सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. प्रशासनाकडून आवश्यक कागदपत्रे स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू असून, आणखी शेतकरी या प्रक्रियेत सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. मुदतीत संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना सरकारकडून विशेष लाभ आणि १० टक्के जमीन परताव्याचा फायदा मिळणार आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनीही सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# सांगवी–वाघवस्ती पुलाची उंची वाढविण्याची मागणी; पावसात वाहतूक ठप्प

## अवघ्या पावसात पूल पाण्याखाली जातो; शालेय विद्यार्थी व रुग्णवाहतुकीला मोठा फटका

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती तालुक्यातील सांगवी ते वाघवस्ती रस्त्यावरील कमी उंचीच्या पुलाची उंची वाढविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. पावसाळ्यात या पुलावरून पाणी वाहत असल्याने वाहतुकीचा वारंवार खोळंबा होत असून, नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सध्या या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम सुरू असताना पुलाची उंची वाढविण्याची गरज व्यक्त केली जात आहे

सांगवी परिसरातील वाघवस्ती, तावरेवस्ती, शिंदे-भापकरवस्ती, ननवरेवस्ती, कदमवस्ती, एजगरवस्ती आणि अहिल्यानगर येथील नागरिकांसाठी सांगवी-वाघवस्ती हा एकमेव प्रमुख संपर्क रस्ता आहे. या मार्गावरील मांदानी चारीवरील पुलाची उंची कमी असल्याने अवघा 40 मिलिमीटर पाऊस झाला, तरी पुलावरून पाणी वाहू लागते.

त्यामुळे नागरिकांना चार किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागतो. पुलावर पाणी आल्याने शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय, दूध वाहतुकीचा खोळंबा, तसेच रुग्णांना रुग्णालयात नेताना अडचणी निर्माण होतात.

मागील वर्षी 25 मे 2025 रोजी झालेल्या 85 मिलिमीटर मान्सूनपूर्व पावसात मांदानी चारीला पूर येऊन संपूर्ण पूल पाण्याखाली गेला होता. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला होता. दरवर्षी उद्भवणाऱ्या या समस्येकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

नागरिकांच्या मते, दोन वर्षांपूर्वी रस्त्याचे अंदाजपत्रक तयार करतानाच पुलाची उंची वाढविण्याची तरतूद होणे आवश्यक होते. गावातील इतर रस्त्यांवर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या, मात्र या रस्त्याकडे कायम दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.



### पुलाच्या उंचीअभावी नागरिकांची गैरसोय

» सांगवी-वाघवस्ती मार्गावरील कमी उंचीच्या पुलामुळे परिसरातील नागरिकांना दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अल्प पावसातही पुलावरून पाणी वाहू लागल्याने वाहतूक ठप्प होते आणि अनेक गावांचा संपर्क तुटतो. याचा फटका शालेय विद्यार्थी, दूध उत्पादक तसेच रुग्णवाहिका सेवेला बसत आहे. सध्या रस्त्याचे डांबरीकरण सुरू असल्याने याच वेळी पुलाची उंची वाढविण्याचे काम करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा स्थानिकांनी व्यक्त केली आहे.